Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/25050402V13P0002

e-ISSN No. 2394-8426
Thoughts on Swatantrya Veer Savarkar -2025
Issue–IV(II), Volume–XIII

# नाटककार स्वातंत्र्यवीर सावरकर

**प्रा. डॉ. संपदा कुलकर्णी -गिरगावकर**
नाट्यशास्त्र विभाग प्रमुख
स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालय
अंबाजोगाई 431517
9422722453
drama@srtcollege.org

साहित्याच्या सर्वच प्रांतात निर्मिती करणारे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी केवळ तीनच नाटके लिहून मराठी नाट्यसृष्टी समृद्ध आणि संपन्न केली आहे. सावरकरांच्या नाट्यसंहितांचे प्रयोग प्रेक्षकांनी पाहून तृप्तीचे समाधान मिळवले. नट, दिग्दर्शक, निर्माता यांना आव्हान वाटणाऱ्या संहितांचे प्रयोग म्हणजे सावरकर यांची नाटके होत. नाटक या व्यामिश्र साहित्यिक घटकातून सावरकरांनी प्रेरणादायी विचार मांडले आहेत. सावरकर यांच्या नाटकांचे विषय हृदयाला सतत जाळणारे, मस्तकाला सतत चिंतनाचे खाद्य पुरवणारे आणि कृतिप्रवण करणारे आहेत. 1927 संगीत उःशाप हे पहिले नाटक सावरकरांनी लिहिले. त्याचा मुख्य विषय अस्पृश्यता निवारण झाले पाहिजे हा आहे. संत चोखोबांच्या चरित्राचे सहाय्य घेऊन हे नाटक लिहिले आहे यात संत चोखामेळा, त्याचा शिष्य किसन, त्याची बहीण कमलिनी, तिचा प्रियकर शंकर अशी प्रमुख पात्रे आहेत. अस्पृश्यांचा होणारा अपमान सहन होत नसल्याने शंकर मुसलमान होतो आणि किसनलाही तो मुसलमान होणे लाभदायक असल्याचे सतत सांगत असतो. पण किसन हिंदूधर्म न सोडण्यासाठी पक्का असतो. मुसलमान झालेल्या प्रियकराला कमलीनी स्वीकारण्यास नकार देते आणि एका नाटकी प्रसंगात त्याला ठार करते. असे या उःशापचे कथानक आहे. हे नाटक नाट्यकला प्रसारक मंडळीने रंगभूमीवर आणले.

1931 साली सावरकरांचे संन्यस्त खड्ग हे नाटक आले. याचे प्रयोग बलवंत नाटक मंडळींनी केले. या नाटकात शब्द शक्तीचे महत्त्व पटवून देणे हा उद्देश दिसून येतो. बौद्ध धर्मातल्या अहिंसा तत्त्वाचा जीवनात होणारा पराभव, त्याची निष्फळता दाखवून देश सशस्त्र व बलसज्ज असावा असे इथे सुचविले आहे. कथानकात गौतम बुद्धाचे जीवन काळातील त्यांच्याच शाक्य कुळातील प्रसंगाचे चित्रण करून बुद्ध अर्थातच संन्यास धर्म व अहिंसा यांचे मंडन केले आहे. त्यांचा शूर सेनापती विक्रम सिंग बुद्धाचा शस्त्रत्यागाचा उपदेश पटत नसतानाही केवळ प्रयोग म्हणून शस्त्र सोडून संन्याशी बनतो. नंतर त्याचा पुत्र वल्लभ सेनापती होतो. काही दिवसातच कौशल राज्याची स्वारी बुद्धाच्या शाक्य राज्यावर स्वारी करते. तेव्हा वल्लभ आणि त्याची पत्नी सुलोचना ही पुरुष वेश धारण करून लढते. सेनापती वल्लभ यात पकडला जातो. तेव्हा कौशल सेनापती त्यांना शरण येण्यासाठी आव्हान देतात. याचा विचार करण्यासाठी विक्रम सिंह सभा बोलावतात. तेव्हा पुरुष वेशातील सुलोचना (अज्ञात तरुण वीर) म्हणून स्पष्ट सांगते. शरण जाऊन वल्लभ परत मिळवण्यापेक्षा, लढत लढत शत्रूचा संहार करावा. शरण जाण्यापेक्षा लढत राहणे हा तिचा मार्ग. शिवाय केवळ पती मिळवण्यासाठी शरण जाणे तिच्यातील वीराला न पटणारे आहे अशी प्रेरणा सावरकरांनी या नाटकातून दाखवून स्फूर्ती-चेतना-स्फुल्लिंग निर्माण केले आहे. या नाटकातील पदे रचना आजही शंभर

वर्षानंतर ही लोकप्रिय आहेत. त्या म्हणजे "शतजन्म शोधताना आरती व्यर्थ झाल्या" किंवा "मर्मबंधातली ही ठेव" या रचना म्हणजे सावरकरांच्या महाकवी असण्याचा प्रत्यय घेणे होय. याच नाटकाची नांदी ही स्वतः सावरकरांनी लिहून नवनांदीचा प्रयोग केला आहे.

१९३३ सावरकरांनी उत्तरक्रिया हे नाटक लिहिले. ज्याचा प्रयोग भारत भूषण संगीत मंडळीने केला आहे. हे नाटक ऐतिहासिक आहे. यात सावरकरांनी रोटीबंदी आणि समुद्रबंदीने जखडलेली हिंदुराष्ट्र या बेड्या तोडून एक प्रबळ राष्ट्र होईल असा आशावाद खुलवला आहे. नाटकातील यशवंतराव समाजसुधारक आणि विश्वविजयी भूमिका मांडतात. यशवंतरावांची पहिली पत्नी सुनीती आणि दुसरी पत्नी सुशीला या दोघीही गुप्त वेषाने रणांगणात उतरतात. या तिघांची भेट लढाईत होते. त्या दोघीही एकत्र सुखात राहण्यास तयार असतात. मात्र सुनीती लढता लढता मृत्युमुखी पडते. पानिपतावर लढताना मरण पावलेल्या सहस्त्रावधी हिंदू वीरांची उत्तरक्रिया दर्भावर नव्हे तर दळभाराने जिंकली तरच साजरी होईल असे वेडी सांगते आणि लढत लढत भडकत्या अग्नीत उडी घेते, ही उत्तरक्रिया.

सावरकरांच्या तीनही नाटकांची कथा बीजे ही ध्येयवादी दृष्टीची असल्याचे जाणवते. ते स्वतः नाटकाकडे केवळ आनंद निर्मिती म्हणून न पाहता संसार कसा असावा हेही नाटकाने दाखवले पाहिजे असे म्हणतात. सावरकरांचे नाट्यविषय पक्के, नटांना आणि दिग्दर्शकांना आव्हानात्मक आहेत. मात्र त्यांचे नाट्यतंत्र विस्कळीत आहे. पण नाटकाची भाषा लयबद्ध, भाषेचे नाविन्य, कृतिप्रवण भाषा असे वैशिष्ट्यपूर्ण आहे. सावरकरांच्या नाटकातील संघर्ष मुख्यतः तत्त्वनिष्ठ यातून निर्माण झाला आहे. नाटककार सावरकर एक अजब रसायन वाटतात. त्यांच्यातील व्यामिश्रपण पदोपदी जाणवते. "मर्मबंधातली ठेव ही..."हे हळुवार पद लिहिणारे सावरकर यांच्या नाटकातील पात्रे त्यांचेच करारी कणखर तेजस्वी व्यक्तिमत्त्व घेऊन आल्याचे भासते. सावरकरांचा वल्लभ मृत्यूशय्येवर म्हणतो, "कोणती घटना सुखांत वा दुःखांत हे आपण सुख कसे मांडतो यावर अवलंबून असते." उत्तरक्रियेत सुनीती जेव्हा धारातीर्थी पडते तेव्हा "याहून सुखकर मरण कोणते?" असेच म्हणते. सावरकरांचा शस्त्र सामर्थ्यावरचा अपरंपार विश्वास त्यांच्या तिन्ही नाटकात जाणवतो.

सन्यस्त खड्ग मध्ये विक्रम देव म्हणतो, "पंचवीस काय, पंचवीस शे वर्षानंतरही या जगावर या जगाच्या दुर्दैवाने शस्त्र युगाचे प्राबल्य दिसून येईल." नाटकात कमलीनीला पळविण्यास आलेल्या सरदारास नाटकी मिठी मारून ती भोसकते आणि सांगते, "ही पाहिलीस सूडाची सुरी" याशिवाय खरी अहिंसा, खरा जितेंद्रिय, खरी भूतदया यांचाही प्रचार ते एवढा प्रभावी करतात की नाटकातील संवादांना नाट्यमूल्य प्राप्त होते. उःशाप मधील कमलिनी, सन्यस्त खड्ग मधील विक्रम, वल्लभ आणि सुलोचना, उत्तरक्रियेतील सुनीता, सुशीला या पात्रात शस्त्रपुरस्काराचे विशिष्ट रंग दिसून येतात.

सावरकरांच्या तीनही नाटकातील पुरुषपात्रे पौरुषसिद्धीसाठी निःस्वार्थ, ध्येयवेडेपणा, तत्त्वनिष्ठ दिसतात. तर स्त्री पात्रांचेही स्त्रीत्व, सौकुमार्य, लावण्य, या दैवी, नैसर्गिक देणगीपेक्षा, वीरांची प्रेरणा, तेजस्विता, शूरा अशी दिसतात.

सावरकर हे ध्येयवेडे व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे प्रतिबिंब त्यांच्या सगळ्या पात्रात दिसते. तर सावरकरांचे संवादलेखन त्यांच्या वक्तृत्वाचे गुणधर्म घेऊन असल्याचे येत असल्याचे जाणवते. सावरकर यांच्या नाटकातील विनोद बुद्धिनिष्ठ स्वरूपाचा आहे. सावरकरांची तीनही नाटके संगीत नाटके आहेत. मात्र केवळ संन्यस्त खड्ग मधील काही पदे सर्वतोमुखी आहेत. महाकवी अशी उपाधी सावरकरांना आपण

लावतो. खरेतर संगीत नाटकातील केवळ पदेच लोकप्रिय ठरली आणि परिचित होतात. मात्र नाट्यपद प्रियतेच्याबाबतीत सावरकरांना नाईलाजाने 'अपवाद' म्हणावे लागेल.

सावरकरांचा मराठी नाट्यभूमीशी जोडलेला अनुबंध जोडला जातो. तो शतसांवत्सरिक महोत्सव. म्हणजेच मराठी रंगभूमीची शतकपूर्ती 1943 साली साजरी झाली. त्यावेळीचे नाट्यसंमेलनाध्यक्ष म्हणून सावरकरांनी केलेले नाट्यकला विषयीचे चतुरस्त्र भाषण या घटनेने या भाषणातून जाणवते. ती सावरकरांचे मराठी रंगभूमी विषयीचे चिंतन. सावरकरांनी आपल्या भाषणात परंपरेचा आदर करत नवतेचा स्वीकार, त्यांचा विज्ञानवादी दृष्टिकोन, सामाजिक संतुलन, नाटकाचा व्यापक विचार, नाटकाची परिणामकारकता, यांचा विचार मांडता आला आहे.

सावरकर हे स्वतः उत्तम नाट्यकर्मी असण्यासोबतच रंगकर्मी असावेत, असे मत कै.चिंतामणराव कोल्हटकर यांनी व्यक्त केले आहे. तर नाट्याचार्य खाडिलकर यांनी तात्यांच्या नाट्यनुभूतीचा आस्वाद घेताना डोळ्यातून येणारे अश्रू म्हणजे सावरकरांच्या नाट्य प्रतिभेला अश्रूंचा अभिषेक करण्यासारखे आहे असे म्हटले आहे. सावरकरांच्या प्रखर विचारांचा प्रभाव मनात ठेवून त्यांची नाटके पाहताना समिक्षक टिकाकार यांनाही त्यांच्या नाट्य प्रतिभेला डावलता येत नाही. अनेक दाखले नाट्यसमीक्षक सापडतात.

एक प्रचारक आणि निष्ठावंत कलावंत असे अपूर्व मिश्रण सावरकरांच्या व्यक्तिमत्वातून जाणवते. सावरकरांच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब त्यांच्या नाट्यसाहित्यात होते. आत्माविष्काराचे, आत्मप्रगटीकरणाचे साधन म्हणून ते नाटकाकडे वळले असावेत असेही वाटते. मात्र त्याच वेळी नाट्यतंत्राचे बंध त्यांनी पाळले नाही. पण केवळ प्रसिद्धीसाठी, लोकप्रियतेसाठी कुठलीही तडजोड त्यांनी केली नसल्याचेही काही संदर्भावरून स्पष्ट होते.

बहुरूपी या आत्मचरित्रात चिंतामणराव कोल्हटकरांनी दोन आठवणी नमूद केल्या आहेत. कोल्हटकरांनी संन्यस्त खड्ग हे नाव बदलायचे सावरकरांना सुचवले होते. ते त्यांनी अमान्य केले. तसेच याच नाटकाचा शेवट सुखांत करण्याचेही कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर यांनी सावरकरांना सुचवले होते. तेही त्यांनी अमान्य केले होते. अभिजात कलावंताला कुठलीच तडजोड मान्य नसते. याचीच ही उदाहरणे या आठवणी वाटतात.

सावरकरांची नाटके, विषय, पात्र निर्मिती, तेजस्वी भाषा, लावण्य पदे, परिणामकारक संवाद आणि नटलेली आहे. नाट्यतंत्राविषयी मुक्त, बेफिकीर असणारी नाटके, "स्वतंत्रगुण वैभवाने चमकदार" आहेत. त्यांचे सामर्थ्य त्यातल्या ऊर्जस्वल विचारात आहे. म्हणूनच ही नाटके सार्वकालिक आव्हानात्मक आहेत.